राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे

सेतू अभ्यास -उत्तर चाचणी

विषय : मराठी

इयत्ता - सहावी                                        एकूण गुण : २०

विद्यार्थ्याचे नाव : ______________________

शाळेचे नाव : ______________________

(सूचना: आवश्यकतेनुसार उत्तर लेखनासाठी पुरवणी कागद/ वही वापरावी.)

प्र.१ अ) खालील उतारा वाचून योग्य शीर्षक लिही .                                        गुण -१

----------------------------

" या वृक्षतोडीवर उपाय काय ? " मुलांनी सरांना विचारले.त्यासाठी आपल्यासारख्या समाजातील सर्व लोकांनी पुढाकार घेतला पाहिजे. अनावश्यक वृक्षतोड होत नाही ना याच्याकडे लक्ष ठेवले पाहिजे.सरांनी समजावल्यामुळे मुलांना झाडे लावण्याचे आणि झाडे जगविण्याचे महत्व समजले. झाडे लावणे आणि झाडे जगविणे हा संदेश घेऊनच मुले घरी परतली.चला तर मग आपण सजग होऊयात.जुनी झाडे वाचवूयात, नवीन झाडे लावूयात आणि जगवूयात .....

१) अति तिथे माती.                    २) करावे तसे भरावे.

३) झाडे लावा, झाडे जगवा.           ४) घरोघरी मातीच्याच चुली.

ब) 'जागृत होऊया' यासाठी उताऱ्यात कोणता शब्द आला आहे ?                                        गुण -१

--------------------------------------------------------------------------------

प्र. २ मुलगा व मुलगी समान आहेत, दोघांनाही शिकवले पाहिजे यासाठी एक घोषवाक्य लिही . गुण-१

--------------------------------------------------------------------------------

प्र. ३ चित्रावरून गोष्ट तयार कर .                                        गुण- ३



प्र. ४ पुढील आद्याक्षरापासून नाम, विशेषण व क्रियापद बनव . गुण- ३

ल –

प्र. ५ रिकाम्या जागेत योग्य क्रियापदाचा वापर कर. गुण- १

राधाने चित्र ----------------------( काढणे ) ( पूर्ण भूतकाळ )

प्र. ६ परिच्छेद वाच व उत्तरे लिही . गुण -३

छोट्या आर्थरला ढगांचा खूप राग आला . त्याने आपल्या कुत्र्याला, कोटोला पलंगाखालून बोलावले आणि आपली खेळण्याची बंदूक घेतली व बाल्कनीत गेला. तो पिल्लाला म्हणाला,“तू ढगावर भूंक, मी माझी बंदूक चालवतो.” कोटो दोनचार वेळेस भुंकला . त्याला वाटले, आर्थर त्याच्यासोबत खेळतोय ; परंतु त्याच्या भुंकण्यात काही दमच नव्हता.अशा भुंकण्याने काळे ढग कसे घाबरणार ? खरं तर आर्थरला कुत्र्याचे भुंकणे ऐकू पण आले नव्हते. तो आपली बंदूक ढगावर रोखून गोळ्या घालण्यातच व्यस्त होता. त्याचा चेहरा रागाने लालबुंद झाला होता व तो मोठ्याने ओरडत होता,”पळा ढगांनो,पळा. तुम्ही का सूर्याला झाकताय? आता घ्या माझी गोळी . ढिश्शुम ! ढिश्शुम !”

१) आर्थरला कोणाचा राग आला होता ?

२) आर्थर गोळी का मारणार होता ?

३) परिच्छेदात आलेल्या ! या चिन्हाचे नाव लिही .

प्र. ७ शालेय वक्तृत्व स्पर्धेत तुझा प्रथम क्रमांक आला. ही आनंदाची बातमी तुझ्या मित्राला / मैत्रिणीला पत्राने कळव . गुण -३

प्र. ८ जाहिरात वाच व त्याआधारे खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिही . गुण- ४




१) सहलीचे आयोजक कोण आहेत ?

२) सहलीची वैशिष्ट्ये कोणती ?

३) सहलीला जाण्यासाठी नोंदणी करणाऱ्याला सवलत का दिली असावी, असे तुम्हाला वाटते ?

४) प्रस्तुत जाहिरात विश्वसनीय आहे, असे तुम्हाला वाटते का ? जाहिरातीतील कोणती गोष्ट तुम्हाला अविश्वसनीय वाटते ?